# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २१/०३/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

### जबर दुखापत

**पो.स्टे. कळमेश्वर** :— अंतर्गत माहुरझरी येथे दिनांक १८/०३/२०२२ चे ०६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अभिषेक मुन्नाजी मेहरे, वय १९ वर्ष, रा. टेकडी वाडी नागपूर याचे आरोपी नामे— उमेश मामुलकर रा. माहुरझरी याचे सोबत भांडण झाले होते. म्हणुन फिर्यादी व त्याचा मित्र सायंकाळी ०७.३० वा. सुमारास माहुरझरी येथे गेले असता आरोपी व त्याचे मित्र अनिकेत ठाकरे व एक इसम यांनी म्हटले की, 'गावात येवुन रंगदारी करता' असे म्हणुन फिर्यादीला काठीने पाठीवर सिटवर उजव्या पायावर मारपीठ करून जखमी केले. त्यांना उपचाराकामी प्रथम ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर व नंतर मेयो हॉस्पीटल नागपुर येथे पुढील उपचाराकरीता रेफर केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३२५, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अण्णा जिचकार मो.न. ९९२३१६८५७३ हे करीत आहे.

### शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपीविरूध गुन्हा नोंद

**पो.स्टे. बेला**:—अंतर्गत २२ कि.मी अंतरावरील मौजा सिर्सी येथे दिनांक १८/०३/२०२२ चे ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— स्वप्निल प्रभाकर तेलरांधे वय २९ वर्षे, रा. गिरड ता.समुद्रपुर जि.वर्धा समुदाय आरोग्य विभाग उप केन्द्र किन्हाळा प्रा.आ.केन्द्र सिर्सी ता.उमरेड जि.नागपुर हे प्राथिमक आरोग्य केंद्र सिर्सी येथे आपले कर्तव्यावर हजर असता अपघाताचा पेशंट नामे— मकबुल शेख वय २५ वर्षे रा सिर्सी याला प्राथिमक आरोग्य केंद्र सिर्सी येथे उपचाराकामी आणले असता हॉस्पीटलच्या आत मध्ये अज्ञात १० ते १५ लोकांच्या बेकायदेशिर जमाव आत घुसुन फिर्यादीची गच्ची पकडुन हातबुक्कीने मारहाण केली. तसेच दवाखाण्यातील सेनिटाईजर, मशीन, कुलर, सि. सि .टी. व्ही, मॉनिटर, बि.पी ऑपरेटर, कमप्युटर, व खिडकीच्या काचा, फोडुन शासकिय मालमत्तेचे ५०,०००/—रू. चे नुकसान केले तेथे डॉ माने हे आले असता त्यांची गच्ची पकडुन त्यांना ही मारपिट केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३५३, १४३, १४९ भादंवी. सहकलम ३ सार्वजनीक संपत्ती नुकसान प्रतीबंधक कायदान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. पंकज वाघोडे मो.क्र. ७३०४४२१०७२४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**